Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. १२ जूलै २०२६ । वर्ष १ ।अंक ९४ ।पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION



रावेरमध्ये दरोड्याचा कट उधळला; दोन जण ताब्यात

(पान २ वर)

» Selected

### मुमराबादच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पथदिवे बंद

**मुमराबाद (जळगाव) |** मुमराबाद येथील छत्रपती शिवाजी महाराज मुख्य चौकातील पथदिवे गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याने सायंकाळनंतर परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरत आहे. यामुळे नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांची गैरसोय होत असून, ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने पथदिव्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक हा मुमराबादमधील प्रमुख आणि वर्दळीचा चौक असून येथे दररोज मोठी बाजारपेठ भरते. दिवसभर नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. मात्र, पथदिवे बंद असल्याने सायंकाळनंतर संपूर्ण परिसर अंधारमय होत असून नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांनाही याचा फटका बसत असून, रात्रीच्या वेळेस ग्राहकांची वर्दळ कमी होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### खडसेंच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाकडे राज्याचे लक्ष • भाजप प्रवेशाच्या चर्चांना वेग

# खडसे पुन्हा भाजपमध्ये? चर्चांना उधाण

## भाजप प्रवेशाबाबत अनिश्चितता कायम; थेट दिल्लीला हॉटलाईन' म्हणत महाजनांचा टोला

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव । राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार एकनाथ खडसे यांच्या संभाव्य भाजप प्रवेशाच्या चर्चांनी महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडवून दिली आहे.**

खडसे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात त्यांच्या भाजप प्रवेशाची घोषणा होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत असतानाच भाजपचे ज्येष्ठ नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी या विषयावर प्रतिक्रिया देत, "एकनाथ खडसे यांची थेट दिल्लीला हॉटलाईन आहे. मी फार छोटा माणूस आहे," असा मिश्किल टोला लगावला.जळगाव येथे पत्रकारांशी संवाद साधताना महाजन म्हणाले की, खडसे यांच्या भाजप प्रवेशाबाबत आपल्याकडे कोणतीही अधिकृत माहिती नाही. "या विषयाची अधिक माहिती मंत्री गुलाबराव पाटील देऊ शकतील. मी गेल्या आठवडाभरापासून अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा करत असून, त्यात व्यस्त आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.



दरम्यान, यापूर्वी खडसेंचा भाजप प्रवेश आपल्या विरोधामुळे रखडल्याची चर्चा होत होती. याबाबत विचारले असता महाजन म्हणाले, "मी कसाकाय खडसेंचा पक्षप्रवेश थांबवणार? त्यांची थेट दिल्लीला हॉटलाईन आहे. माझी तर मुंबईपर्यंतही हॉटलाईन नाही. मी जळगावमध्येच बरा आहे. त्यांना वरून ग्रीन सिग्नल मिळाला तर स्वागतच आहे." यावेळी त्यांनी मागील भाजप प्रवेशाच्या चर्चेची आठवण करून देत, "मागच्या वेळी फोटो काढला आणि नंतर ते गायब झाले. मी काही भविष्यकार नाही, संजय राऊत नाही," असे म्हणत उपस्थितांमध्ये हास्याची लाट निर्माण केली. खडसे यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी निमंत्रण मिळाले का, असा प्रश्न विचारला असता महाजन म्हणाले, "ते मोठे नेते आहेत. अजून आम्हाला निमंत्रण मिळालेले नाही. मिळाले तर जाण्याबाबत विचार करू. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा आहेत." याचवेळी खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीच्या राजकारणात जाणार असून, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे मुख्यमंत्री होतील, असा दावा केल्याबाबतही महाजन यांनी जोरदार पलटवार केला."संजय राऊतांना हे अधिकार कुणी दिले आहेत, माहीत नाही. उद्धव ठाकरे यांनी दिले असतील, पण भाजपने असे कोणतेही अधिकार त्यांना दिलेले नाहीत. ते कधी उद्धव ठाकरेंना पंतप्रधान करतात, कधी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री राहणार नाहीत म्हणतात, तर कधी बावनकुळे मुख्यमंत्री होतील असे सांगतात. ते कोणत्याही पदावरील व्यक्तीबाबत वाटेल ते बोलतात. हा त्यांचा धर्मच झाला आहे," अशी टीका महाजन यांनी केली.

### महाजन खडसेंबद्दल नेमकं काय म्हणाले?

एकनाथ खडसे यांच्या संभाव्य भाजप प्रवेशाबाबत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांमुळे राज्याच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा रंगली आहे. खडसे यांच्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाकडे आता सर्वांचे लक्ष लागले असून, त्या कार्यक्रमातून कोणता राजकीय संदेश दिला जातो, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या दोन्ही पक्षांकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसल्याने खडसेंच्या भविष्यातील राजकीय वाटचालीबाबतचा सस्पेन्स कायम आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# आईचे ५.६० लाखांचे दागिने चोरून घरफोडीचा बनाव!

## फिर्यादीच निघाली आरोपी

**जन सम्राट टाईम्स**





**धुळे | प्रतिनिधी:** घरफोडी झाल्याची तक्रार देणारी फिर्यादीच या गुन्ह्याची आरोपी निघाल्याचा धक्कादायक प्रकार धुळ्यात उघडकीस आला आहे. पश्चिम देवपूर पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करत घरफोडीचा बनाव उघड केला असून, मुलीनेच आपल्या आईचे ५ लाख ६० हजार रुपये किमतीचे ९०.३० ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून खोटी फिर्याद दिल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी आरोपी महिलेकडून सर्व दागिने हस्तगत केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान सुंदरनगर, वलवाडी (देवपूर) येथील घरातून अज्ञात चोरट्याने कस्तुरीबाई यांच्या मालकीचे सोन्याचे मंगळसूत्र, छोटी सोन्याची माळ, दोन सोन्याच्या बांगड्या आणि सोन्याची पोत असा एकूण ५ लाख ६० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची तक्रार सोनल भास्कर बागले (वय ५८) यांनी दिली होती.

या तक्रारीवरून १० मार्च २०२६ रोजी पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(१) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक जिभाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आला.

तपासादरम्यान घटनास्थळावरील परिस्थितीजन्य पुरावे, परिसरातील साक्षीदारांचे जबाब आणि फिर्यादीच्या कथनातील विसंगती पोलिसांच्या निदर्शनास आली. चौकशीदरम्यान फिर्यादीच्या जबाबात वारंवार बदल होत असल्याने तिच्यावर संशय अधिक बळावला.

अखेर १० जुलै २०२६ रोजी पोलिसांनी सोनल बागले यांची सखोल चौकशी केली. यावेळी त्यांनी घरफोडीचा बनाव रचल्याची कबुली दिली. तसेच आईचे चोरीस गेलेले ९०.३० ग्रॅम वजनाचे, ५ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने पोलिसांच्या स्वाधीन केले.


या प्रकरणात घरफोडीचा कोणताही प्रकार घडला नसून, फिर्यादीनेच चोरीचा बनाव रचून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

# भुसावळ नगरपालिकेतील AC बसविण्याच्या माहितीवर RTI वाद; अपूर्ण उत्तराविरोधात प्रथम अपील

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ| प्रतिनिधी :** भुसावळ नगरपालिकेच्या कार्यालयातील विविध दालनांमध्ये बसविण्यात आलेल्या वातानुकूलित यंत्रणा (एसी) संदर्भातील माहितीवरून माहिती अधिकार (RTI) अंतर्गत वाद निर्माण झाला आहे. माहिती अधिकार कायदा, 2005 अंतर्गत दाखल केलेल्या अर्जाला अपूर्ण व अपुरी माहिती देण्यात आल्याचा दावा अर्जदार प्रमोद जगन्नाथ पाटील यांनी केला असून, त्यांनी याप्रकरणी प्रथम अपील दाखल केले आहे.

अर्जदारांनी नगरपालिकेकडे एसी बसविण्यासाठी आवश्यक प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मान्यता, झालेला खर्च, संबंधित अधिकाऱ्यांचे वेतन स्तर, मागील दोन वर्षांचे वीज बिल तसेच एसीमुळे वाढलेल्या अतिरिक्त विद्युत भाराची (ELECTRICAL LOAD) माहिती मागितली होती. नगरपालिकेकडून प्राप्त उत्तरात काही वीज बिलांची माहिती देण्यात आली. मात्र, एसीमुळे वीज भारात किती वाढ झाली, यासंदर्भातील तपशील उपलब्ध करून देण्यात आला नसल्याचा अर्जदारांचा दावा आहे. तसेच





ELECTRICAL PWD ची तांत्रिक मान्यता, विशेष परवानगी आणि इतर संबंधित कागदपत्रांबाबत "माहिती उपलब्ध नाही" असे उत्तर देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. या उत्तरावर असमाधान व्यक्त करत ९ जुलै २०२६ रोजी माहिती अधिकार कायद्यानुसार प्रथम अपील दाखल करण्यात आले आहे. अपील प्राधिकरणाकडे संपूर्ण, प्रमाणित आणि कायद्यानुसार अपेक्षित माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी अर्जदारांनी केली आहे.

### अपील प्राधिकरणाकडे माहितीची मागणी

अर्जदारांनी नगरपालिकेकडे एसी बसविण्यासाठी आवश्यक प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मान्यता, झालेला खर्च, संबंधित अधिकाऱ्यांचे वेतन स्तर, मागील दोन वर्षांचे वीज बिल तसेच एसीमुळे वाढलेल्या अतिरिक्त विद्युत भाराची (ELECTRICAL LOAD) माहिती मागितली होती. नगरपालिकेकडून प्राप्त उत्तरात काही वीज बिलांची माहिती देण्यात आली. मात्र, एसीमुळे वीज भारात किती वाढ झाली, यासंदर्भातील तपशील उपलब्ध करून देण्यात आला नसल्याचा अर्जदारांचा दावा आहे. तसेच ELECTRICAL PWD ची तांत्रिक मान्यता, विशेष परवानगी आणि इतर संबंधित कागदपत्रांबाबत "माहिती उपलब्ध नाही" असे उत्तर देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, या प्रकरणात प्रथम अपील प्राधिकरण काय निर्णय घेते, तसेच नगरपालिकेला संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले जातात का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अवघ्या काही तासांत घरफोडीचा छडा; चार आरोपींना १.७० लाखांच्या मुद्देमालासह पिंपळनेर पोलिसांनी जेरबंद

**जन सम्राट टाईम्स**

**साक्री/पिंपळनेर:** साक्री तालुक्यातील कुडाशी परिसरातील रेशन दुकानात घरफोडी करून गव्हाचे १० कट्टे चोरून नेणाऱ्या चार आरोपींना पिंपळनेर पोलिसांनी अवघ्या काही तासांत अटक करत चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. आरोपींकडून चोरीचा माल आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या दोन दुचाकींसह एकूण १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या जलद कारवाईमुळे पिंपळनेर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ जुलै २०२६ रोजी पहाटे २ ते ४ वाजण्याच्या दरम्यान फिर्यादी पंढरीनाथ बारकू पवार यांच्या महुबंद (पोस्ट कुडाशी, ता. साक्री) येथील शासकीय रेशन दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला. दुकानातील ५० हजार रुपये किमतीचे ५० किलो वजनाचे गव्हाचे १० कट्टे चोरून नेण्यात आले. याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७३/२०२६ भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ), ३३१(३) आणि ३३१(४) अन्वये घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याची माहिती मिळताच पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नामदेव सहारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी





धाव घेतली. घटनास्थळावरील परिस्थितीजन्य पुरावे, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची सूत्रे वेगाने हलवली. तपासादरम्यान पोलिसांनी पोबारे (पोस्ट कुडाशी, ता. साक्री) येथून प्रदीप छोटीराम गांगुर्डे (२५), गुलाब गोकुळ शिंदे (३१), योगेश यशमल बहिरम (२४) आणि मंगेश गुलाब सावळे (२६) या चौघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी घरफोडीची कबुली दिल्यानंतर चोरीचा मुद्देमाल पोलिसांच्या स्वाधीन केला. आरोपींकडून ५० हजार रुपये किमतीचे गव्हाचे १० कट्टे, ७० हजार रुपये किमतीची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल आणि ५० हजार रुपये किमतीची हिरो आयस्मार्ट मोटारसायकल असा एकूण १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी अवघ्या काही तासांत गुन्ह्याचा छडा लावत चारही आरोपींना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली असून, या आरोपींकडून आणखी काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जळगावात एमडी ड्रग्जविरोधात मोठी कारवाई

## ५६.२९ ग्रॅम मेफेड्रोन हस्तगत



**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहरात अंमली पदार्थांच्या अवैध विक्री व तस्करीविरोधात स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) आणि जिल्हापेठ पोलिसांनी संयुक्तपणे मोठी कारवाई करत ५६.२९ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) जप्त केले. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, एक आरोपी पसार झाला आहे. पोलिसांनी ३ लाख ६ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. 'नशामुक्त भारत' अभियानांतर्गत जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिले आहेत. त्यानुसार १० जुलै रोजी पहाटे स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना गुप्त माहिती मिळाली की, छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यामागील शासकीय तांत्रिक विद्यालयाशेजारील जी.एस. ग्राऊंड परिसरात काही व्यक्ती मेफेड्रोन विक्रीसाठी येणार आहेत. या माहितीच्या आधारे एलसीबी आणि जिल्हापेठ पोलिसांनी संयुक्तपणे सापळा रचला. काही वेळात मोटारसायकलवरून आलेल्या तिघांना पोलिसांनी अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यापैकी एक जण अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाला. उर्वरित दोघांना ताब्यात घेऊन तपासणी केली असता त्यांच्या ताब्यातून ५६.२९ ग्रॅम मेफेड्रोन आढळून आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी २ लाख ८१ हजार ५४० रुपये किमतीचे मेफेड्रोन तसेच २५ हजार रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर (एमएच-१९-डीजे-०१३२) मोटारसायकल जप्त केली. अशाप्रकारे एकूण ३ लाख ६ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी जयेश देविदास तायडे (वय २७, रा. हरीओम नगर, मोहन टॉकीजजवळ, जळगाव) आणि हितेंद्र शिवाजी परदेशी (वय ३१, रा. कांचन नगर, जळगाव) यांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत दोघांनीही फरार आरोपी भैय्या सोनवणे (रा. कांचन नगर, जळगाव) याच्याकडून विक्रीसाठी मेफेड्रोन घेतल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### फरार आरोपीचा शोध सुरू आहे

दरम्यान, अटक करण्यात आलेल्या जयेश तायडे याच्याविरुद्ध यापूर्वी रामानंदनगर, जिल्हापेठ आणि जळगाव शहर पोलीस ठाण्यांमध्ये खुनाचा प्रयत्न, सरकारी कर्मचाऱ्याला कामात अडथळा, गंभीर दुखापत आणि दरोडा यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ०२१७/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा, १९८५ मधील कलम ८(क), २२(क) व २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# शासकीय वस्तीगृहात अन्नातून विषबाधेचा धक्कादायक प्रकार

## ६ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक • पालकांचा निकृष्ट अन्नपुरवठ्याचा गंभीर आरोप • चौकशीचे आदेश

**संजय मोहिते**

**जन सम्राट टाईम्स | शहादा:** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथील समाज कल्याण विभागाच्या शासकीय निवासी नवबौद्ध वस्तीगृहात रविवारी रात्री अन्नातून विषबाधेची धक्कादायक घटना घडली. रात्रीचे जेवण केल्यानंतर अचानक ४० ते ५० विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ आणि अस्वस्थतेचा त्रास सुरू झाला. यामध्ये सहा विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या घटनेमुळे शहादा शहरासह संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यात खळबळ उडाली असून वस्तीगृहातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना रात्रीच्या जेवणात शेवग्याची भाजी, भात आणि पोळ्या देण्यात आल्या होत्या. जेवण केल्यानंतर काही वेळातच अनेक विद्यार्थ्यांना पोटदुखी, उलट्या, मळमळ आणि चक्कर येण्याचा त्रास सुरू झाला. काही विद्यार्थ्यांची प्रकृती झपाट्याने खालावत असल्याचे लक्षात येताच वस्तीगृह प्रशासनाने त्यांना तातडीने शहादा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. ग्रामीण रुग्णालयात अल्पावधीत मोठ्या संख्येने विद्यार्थी दाखल झाल्याने आरोग्य यंत्रणेची धावपळ उडाली. डॉक्टरांनी तातडीने उपचार सुरू केले. उपचारादरम्यान सहा विद्यार्थ्यांची प्रकृती अधिक गंभीर असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना अधिक उपचारासाठी



खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. उर्वरित विद्यार्थ्यांवर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले. आपल्या मुलांच्या प्रकृतीची चिंता व्यक्त करत त्यांनी वस्तीगृह प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. काही काळ रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेनंतर वस्तीगृहातील अन्नाच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्यार्थी आणि पालकांनी वस्तीगृहात सातत्याने निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात असल्याचा गंभीर आरोप केला आहे. यापूर्वीही अनेक वेळा जेवणाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी करण्यात आल्या होत्या; मात्र त्याची दखल घेण्याऐवजी विद्यार्थ्यांना आणि पालकांना दमदाटी करण्यात येत असल्याचा धक्कादायक आरोपही त्यांनी केला. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### वस्तीगृहातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न

घटनेची माहिती मिळताच प्रांताधिकारी दीपक गिरासे, वैद्यकीय अधिकारी तसेच समाज कल्याण विभागाचे अधिकारी तातडीने रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी उपचार सुरू असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेऊन डॉक्टरांकडून आरोग्याची माहिती घेतली. तसेच वस्तीगृहातील अन्नाच्या नमुन्यांची तपासणी करून विषबाधेचे नेमके कारण शोधण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, या घटनेमुळे समाज कल्याण विभागाच्या वस्तीगृहांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या निष्काळजीपणाला जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई होणार का, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जाणार, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# विश्वास कमावणे हाच 'वीरा पेट्रोलियम'चा खरा नफा :पालकमंत्री गुलाबराव पाटील

## आव्हाणी फाटा येथे 'वीरा पेट्रोलियम'चे उद्घाटन; ग्राहकाभिमुखतेची ग्वाही

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** आव्हाणी फाटा येथे भारत पेट्रोलियमच्या नव्या 'वीरा पेट्रोलियम' इंधन सेवा केंद्राचे उद्घाटन महाराष्ट्राचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रामाणिक सेवा, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांचा विश्वास हेच कोणत्याही उद्योगाचे खरे भांडवल असल्याचे प्रतिपादन पालकमंत्र्यांनी केले. उद्घाटनप्रसंगी बोलताना गुलाबराव पाटील म्हणाले, "उद्योग क्षेत्रातील यशामागे कुटुंबाची साथ, संघर्षाची जिद्द आणि जनतेचा विश्वास हेच खरे भांडवल असते. पेट्रोल पंपातून केवळ आर्थिक नफा मिळवणे महत्त्वाचे नाही, तर ग्राहकांचा विश्वास कमावणे अधिक महत्त्वाचे आहे. अचूक मोजमाप, दर्जेदार इंधन, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांचे समाधान या चार आधारस्तंभांवर 'वीरा पेट्रोलियम'ची वाटचाल उभी राहील." ते पुढे म्हणाले की, जनतेचा आशीर्वाद हीच सर्वात मोठी संपत्ती असून, जनसेवेची भावना कायम ठेवत ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला जाईल. यावेळी भारत पेट्रोलियमचे टेरिटरी मॅनेजर राहुल कचरे यांनी 'वीरा पेट्रोलियम' हा सुरत-कोलकाता राष्ट्रीय महामार्गावरील



बीपीसीएलच्या सेवाविस्तारातील महत्त्वाचा प्रकल्प असल्याचे सांगितले. उत्कृष्ट सुविधा, दर्जेदार इंधन आणि ग्राहकाभिमुख सेवेमुळे हा पेट्रोल पंप अल्पावधीतच ग्राहकांचा विश्वास संपादन करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जीपीएस संस्थेचे सचिव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी केले. त्यांनी 'वीरा पेट्रोलियम'च्या स्थापनेमागील उद्देश, ग्राहकाभिमुख सेवा आणि भविष्यातील नियोजन याविषयी माहिती देत, येथे ई-वाहनांसाठी चार्जिंग स्टेशनची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी भारत पेट्रोलियमकडे केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भूषण पाटील यांनी केले, तर आभार जीपीएस कॉलेजचे चेअरमन विक्रम पाटील यांनी मानले. यावेळी भारत पेट्रोलियमचे सेल्स मॅनेजर आदित्य कुमार, इंजिनिअरिंग ऑफिसर धनंजय कुमार, संभाजीनगर विभागाचे सेल्स मॅनेजर हरीशजी, उपमहापौर मनोज चौधरी, मोहम्मदभाई मूर्तिजा शेख, अभय जैन, सुनील पाटील, अमोल पाटील, सुभाष पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न

"उद्योग क्षेत्रातील यशामागे कुटुंबाची साथ, संघर्षाची जिद्द आणि जनतेचा विश्वास हेच खरे भांडवल असते. पेट्रोल पंपातून केवळ आर्थिक नफा मिळवणे महत्त्वाचे नाही, तर ग्राहकांचा विश्वास कमावणे अधिक महत्त्वाचे आहे. अचूक मोजमाप, दर्जेदार इंधन, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांचे समाधान या चार आधारस्तंभांवर 'वीरा पेट्रोलियम'ची वाटचाल उभी राहील." ते पुढे म्हणाले की, जनतेचा आशीर्वाद हीच सर्वात मोठी संपत्ती असून, जनसेवेची भावना कायम ठेवत ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला जाईल.

## हजरत भडंगशाह वली व काले सय्यद पीर यांचा उर्स व लंगर सोहळा

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव। प्रतिनिधी :** धरणगाव शहरातील भडंगपुरा परिसरात हजरत भडंगशाह वली रहमतुल्लाह अलैह व काले सय्यद पीर यांच्या पवित्र उर्सनिमित्त आयोजित करण्यात आलेला उर्स व लंगर सोहळा धार्मिक वातावरणात, भक्तिभावाने आणि उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात सर्वधर्मीय नागरिकांसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन करीम खान यांनी केले. उर्सनिमित्त आयोजित समारंभात मुस्लिम समाजाचे अध्यक्ष हाजी इरफान शेख यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी शिवसेना (उबाठा) उपनेते गुलाबराव वाघ, नगरसेवक विनय भावे, विलास महाजन, लक्ष्मण माळी, परमेश्वर महाजन, तौसिफ पटेल, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष लक्ष्मणराव पाटील, हेमंत महाजन,



सद्दाम अली, वसीम पिंजारी, सलीम मोमीन यांच्यासह सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी उर्सनिमित्त आयोजित लंगराचा लाभ घेत आयोजकांचे कौतुक केले.

उर्स व लंगर सोहळ्याचे नियोजन आणि यशस्वी आयोजन करण्यासाठी संदल कमिटीचे अध्यक्ष निसार अली सय्यद, उपाध्यक्ष नदीम काझी तसेच सज्जाद अली, गुलशेर खान, शोएब खान आणि युनूस खान यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी समाजात बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मसमभाव अधिक दृढ व्हावा तसेच देशात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांचा सन्मान

### भडगाव आरोग्य विभागाचा उपक्रम




जन सम्राट टाईम्स

**भडगाव। प्रतिनिधी :** जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त भडगाव तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. भडगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी बी. के. अजने यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन संबंधितांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रसूती सेवा, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, तांबी (IUCD), PPICUD, अंतरा आदी कार्यक्रमांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच डॉ. समाधान वाघ यांचा सर्जन म्हणून विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी बी. के. अजने यांनी माता व बाल आरोग्य क्षेत्रात आरोग्य विभागाने ग्रामीण भागात केलेल्या कार्याचे कौतुक केले. केंद्र स्तरावर मोठ्या प्रमाणात सुरक्षित प्रसूती होत असून, त्यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान वाघ यांनी यंदाच्या जागतिक लोकसंख्या दिनाचे "दोन जन्मात अंतर, कुटुंब सदृढ निरंतर" हे घोषवाक्य स्पष्ट करत कुटुंब नियोजनाचे महत्त्व अधोरेखित केले. योग्य वयात विवाह, नियोजित गर्भधारणा आणि कुटुंब नियोजनाचा स्वीकार ही काळाची गरज असून, सुदृढ आई, निरोगी बालक आणि आनंदी कुटुंबासाठी प्रत्येकाने लोकसंख्या नियंत्रणाबाबत जागरूक राहावे, असे आवाहन त्यांनी केले. जागतिक लोकसंख्या दिन हा कुटुंब नियोजन, प्रजनन आरोग्य आणि जबाबदार पालकत्वाबाबत जनजागृती करण्याचा महत्त्वाचा दिवस असल्याचे सांगत ही माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. प्रतीक भोसले (पिंपरखेड), डॉ. नितीन सोनवणे (गुढे) यांच्यासह भडगाव तालुक्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि समुदाय आरोग्य अधिकारी उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका आरोग्य सहाय्यक दगडू शिरसाठ, जयराम महाजन आणि अजय अलई यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. समाधान वाघ यांनी केली, सूत्रसंचालन श्रीकांत मराठे (आरोग्य सहाय्यक, कजगाव) यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय सोनार कळवाडीकर (आरोग्य निरीक्षक, पिंपरखेड) यांनी केले.

## शाह बाबा दर्ग्यात ऊर्सनिमित्त दादासाहेब पाटील यांची भेट



जन सम्राट टाईम्स

**पारोळा। प्रतिनिधी :** पारोळा शहरातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत मिश्किन शाह बाबा दर्ग्यात आयोजित ऊर्स शरीफ कार्यक्रमास लोकनियुक्त नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी मुस्लिम समाजाच्या वतीने नगराध्यक्ष दादासाहेब पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देत ऊर्स सोहळ्याचे महत्त्व अधोरेखित केले या प्रसंगी शिवसेना गटनेते तथा नगरसेवक अमृत चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनीष पाटील, माजी उपनगराध्यक्ष दिपक अनुष्ठाण, नगरसेवक नितीन सोनार, मनोज जगदाळे, भूषण टिपरे, पंकज मराठे, इम्रान शेख सलीम, नजीर खान बेलदार, माजी नगरसेवक अमोल पाटील, दर्गा ट्रस्टचे पदाधिकारी, ट्रस्टी मंडळाचे सदस्य, मुस्लिम समाजबांधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऊर्स शरीफ निमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात देशात शांतता, सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. उपस्थितांनी एकात्मता आणि परस्पर सौहार्दाचा संदेश देत हा सोहळा उत्साहात साजरा केला.

## मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमाचा आढावा

### ३० जून ते २९ मोहिम; नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा

जन सम्राट टाईम्स





**पारोळा | प्रतिनिधी :** पारोळा शहरात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या मतदार यादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने आढावा बैठक पारोळा नगरपरिषदेच्या सभागृहात तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी डॉ. उल्हास देवरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर लोकनियुक्त नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत बी. पाटील, शहर तलाठी निशिकांत माने, प्रशासकीय अधिकारी यामिनी लक्ष्मणसा जटे, माजी उपनगराध्यक्ष दिपक अनुष्ठाण, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनिष पाटील, नगरसेवक अमोल शिरोळे, भावडू राजपूत, भूषण टिपरे, धीरज महाजन, विनोद पाटील, विवेक पाटील, इम्रान शेख सलीम, नजीर खान बेलदार, दगडू पवार, सौ. मंगला चौधरी, कार्यालय अधीक्षक अनिल तिदमे, वरिष्ठ लिपिक ज्ञानेश्वर रिजल तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी किरण विसावे, निर्मल दूधवे, रवींद्र ठाकरे, विशाल गायकवाड आणि सचिन चौधरी उपस्थित होते. बैठकीत विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मतदार यादीतील नवमतदारांची नोंदणी, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे, तसेच आवश्यक दुरुस्त्या वेळेत पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. यावेळी तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांनी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या समन्वयातून मतदार यादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रम १०० टक्के यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. लोकनियुक्त नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत पाटील यांनीही शहरातील नागरिक आणि सर्व नगरसेवकांच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागात जनजागृती करून या राष्ट्रीय कार्यात पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. बैठकीत मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत जनजागृती वाढविणे, पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे आणि विहित कालावधीत पुनरिक्षण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

## भुसावळच्या प्रभाग क्र. २४ मध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत; चार जण जखमी, नागरिकांमध्ये संताप

### दिना नगर, नेब कॉलनी व सुहास नगर परिसरातील घटना!

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** भुसावळ शहरातील प्रभाग क्रमांक २४ मध्ये भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. परिसरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याच्या सलग घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, देना नगर परिसरात एका तरुणास आणि एका वयोवृद्ध व्यक्तीस भटक्या कुत्र्याने चावा घेतला. त्यानंतर नेब कॉलनीमध्ये एका लहान मुलाच्या कानाला कुत्र्याने



चावा घेतल्याची घटना घडली. तसेच सुहास नगर परिसरात एका वयोवृद्ध व्यक्तीच्या पोटाला चावा घेतल्याची माहितीही समोर आली आहे. स्थानिकांच्या दाव्यानुसार, एकाच कुत्र्याने चार नागरिकांवर हल्ला केला असून एका दुसऱ्या कुत्र्यावरही हल्ला केल्याची घटना घडली. त्यामुळे परिसरात घबराट पसरली. नागरिकांनी लाठ्या-काठ्या घेऊन संबंधित कुत्र्याचा शोध घेतला. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित कुत्रा पिसाळलेला असल्याचा संशय असल्याने पुढील अनर्थ टाळण्यासाठी त्याला ठार मारण्यात आले.या घटनेनंतर नागरिकांनी भुसावळ नगरपालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आहे. भटक्या कुत्र्यांना पकडण्याची मोहीम प्रभावीपणे राबवली जात नसल्याचा आरोप करत, केवळ काही भागांपुरती कारवाई करून इतर गल्लीबोळांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका नागरिकांनी केली. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, देना नगर परिसरात एका तरुणास आणि एका वयोवृद्ध व्यक्तीस भटक्या कुत्र्याने चावा घेतला. एका लहान मुलाच्या कानाला कुत्र्याने चावा घेतल्याची घटना घडली. तसेच सुहास नगर परिसरात एका वयोवृद्ध व्यक्तीच्या पोटाला चावा घेतल्याची माहितीही समोर आली आहे. प्रभाग क्रमांक २४ सह शहरातील इतर भागांमध्येही भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी व्यापक मोहीम राबवावी, नागरिकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## रावेरमध्ये दरोड्याचा कट उधळला; दोन जण ताब्यात

### बनावट नोटा व इको कार जप्त



जन सम्राट टाईम्स

**रावेर | प्रतिनिधी :** रावेर शहरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या संशयित टोळीचा रावेर पोलिसांनी धाडसी पाठलाग करून कट उधळून लावला. या कारवाईत दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून तलवार, टॉमी, मिरचीपूड, दोरखंड, बनावट नोटा आणि एक इको कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर त्यांच्या तिघा साथीदारांनी अंधाराचा आणि शेतशिवाराचा फायदा घेत पसार होण्यात यश मिळवले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ जुलै रोजी पाल दुर्गक्षेत्र येथे कर्तव्यावर असलेले पोलीस हेड कॉन्स्टेबल ईश्वर चव्हाण यांना पाल गावातून एक संशयास्पद इको कार रावेरच्या दिशेने भरधाव वेगाने जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी गुन्हे शोध पथकाला तातडीने रवाना करून दोन्ही बाजूंनी नाकाबंदीचे नियोजन केले. रावेर शहरातील आठवडे बाजार परिसरातून बऱ्हाणपूर रस्त्यावरील शेताकडे जाताना वाहन चिखलात अडकल्याने संशयितांचा पळून जाण्याचा प्रयत्न फसला. यावेळी पोलिसांसह स्थानिक नागरिकांनीही पाठलाग केला. त्यापैकी तिघेजण शेतातून पसार झाले, तर दोघांना नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. दोघांनाही उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. वाहनाची झडती घेतली असता त्यातून लोखंडी तलवार, टॉमी, पेंचिस, लाल मिरचीपूड, दोरखंड, सुमारे तीन लाख रुपये दर्शनी मूल्याच्या 'चिल्ड्रन्स बँक'च्या बनावट नोटा तसेच एमएच-१९-ईए-२४०३ क्रमांकाची मारुती सुझुकी इको कार जप्त करण्यात आली. या प्रकरणात निखिल प्रविण पाटील (वय २०) आणि अल्ताफ जलाल शेख (वय २६, दोघे रा. साईनगर, घोडबंदर रोड, कासार वडवली, जि. ठाणे) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. मेहरबान जहांगीर तडवी (रा. पाल) याच्यासह अन्य दोन संशयितांचा शोध सुरू आहे. या प्रकरणी रावेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे तसेच शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयितांचा इतर गुन्ह्यांशी संबंध आहे का आणि ते नेमका कोणता गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत होते, याचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन, तुषार पाटील तसेच रावेर गुन्हे शोध पथकाने केली.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## महिनाभरापूर्वी बांधलेला महाराष्ट्र-मध्यप्रदेश जोडणारा पूल पहिल्याच पावसात वाहून

### नागरिकांचा संपर्क विस्कळीत • ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर| प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील रिच्यापाडा येथे महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांना जोडणारा पूल पहिल्याच पावसात वाहून गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अवघ्या महिनाभरापूर्वी लाखो रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेला हा पूल कोसळल्याने दोन्ही राज्यांतील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि शिरपूर पंचायत समिती बांधकाम विभागाच्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत या पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. मात्र, मुसळधार पावसाच्या पहिल्याच फटक्यात पूल वाहून गेल्याने शासनाच्या निधीतून करण्यात आलेल्या कामाच्या दर्जावर संशय व्यक्त केला जात आहे. या पुलामुळे शिरपूर तालुक्यातील रिच्यापाडा, पळासनेरसह महाराष्ट्रातील गावांचा तसेच मध्यप्रदेशातील आंबापाणी व परिसरातील



गावांचा संपर्क सुलभ झाला होता. पूल वाहून गेल्याने नागरिकांना पुन्हा पर्यायी आणि धोकादायक मार्गांचा वापर करावा लागत असून दैनंदिन वाहतुकीवर परिणाम झाला आहे. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पुलावरच ठिय्या आंदोलन करत संबंधित ठेकेदार, अभियंते आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली. बांधकामादरम्यान गुणवत्तेची तपासणी झाली होती का, कामावर देखरेख कोणी केली, निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले का, असे प्रश्न नागरिकांनी उपस्थित केले. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावर पूर्वी पूल नसल्याने पावसाळ्यात मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे नवीन पूल उभारण्यात आला होता. मात्र, अवघ्या महिनाभरातच तो वाहून गेल्याने नागरिकांचा शासनाच्या विकासकामांवरील विश्वास डळमळीत झाला आहे. दरम्यान, या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी व ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि दर्जेदार पद्धतीने नव्याने पूल उभारण्यात यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

### दैनंदिन वाहतुकीवर परिणाम झाला

या पुलामुळे शिरपूर तालुक्यातील रिच्यापाडा, पळासनेरसह महाराष्ट्रातील गावांचा तसेच मध्यप्रदेशातील आंबापाणी व परिसरातील गावांचा संपर्क सुलभ झाला होता. पूल वाहून गेल्याने नागरिकांना पुन्हा पर्यायी आणि धोकादायक मार्गांचा वापर करावा लागत असून दैनंदिन वाहतुकीवर परिणाम झाला आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306